N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** मिरा-भाईंदर, वसई-विरार **P.S.(ठाणे):** कशिमिरा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0338 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**09/05/2023 18:29

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 27/03/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 09/05/2023
**Time From (वेळेपासून):** 00:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 00:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 09/05/2023 **Time (वेळ):** 17:56 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 034

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/05/2023 18:11 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पोलीस आयुक्तालय मिरा-भाईंदर, ,वसई-विरार येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विशाल किसनराव निंबाळकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सी/102, समध्दी अपार्टमेंट,समेळपाडा, नालासोपारा प,कशिमिरा,मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सी/102, समध्दी अपार्टमेंट,समेळपाडा, नालासोपारा प,कशिमिरा,मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संजय तुकाराम पवार | | | 1. रुम नं ई/704, विनय युनिक , बिल्डींग नं 04, गोकुळ टाऊनशिप,विरार प,कशिमिरा, मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय,महाराष्ट्र, भारत |
| 2 | गणेश काशिनाथ वाघेरा | | | 1. रुम नं 502, A02, ई लाईट सोसायट,नागला बंदर, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | भाईंदरपाडा, ,ठाणे प,कोशिशीर, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 09/05/2023.

मी विशाल किसनराव निंबाळकर, वय 37 वर्षे, पोहवा/07090 नेमणुक वालीव पोलीस ठाणे, पोलीस आयुक्तालय मिरा-भाईंदर, वसई-विरार, रा. सी/102, समृध्दी अपार्टमेंट, समेळपाडा, नालासोपारा प. मो. 7744828377 समक्ष हजर राहून जबाब लिहून देतो की,

मी वरीलप्रमाणे असून मी सन 2007 मध्ये ठाणे ग्रामीण पोलीस दलात पोलीस का◌ॅन्स्टेबल या पदावर भरती झालो असून सध्या वालीव पोलीस ठाणे येथे नेमणुकीस आहे.

माझे वडील श्री. किसनराव निंबाळकर हे कार्चबिंदू या आजाराने आजारी असल्याने मी डा◌ॅक्टरांच्या सल्ल्याने महालक्ष्मी नेत्र रूग्णालय, बारामती, जि.पुणे येथे दवाउपचार केले होते. त्यावेळी वडीलांच्या आजारपणाचा खर्चाच्या बिलाची प्रतिपुर्ती होण्यासाठी मी शासकीय नियमानुसार पोलीस आयुक्तालय मिरा-भाईंदर, वसई-विरार येथे दिनांक 05/10/2021 रोजी अर्ज सादर करून त्यासोबत आवश्यक ती कागदपत्र जोडली होती. त्यानंतर सदरच्या अर्जावर योग्य ती कार्यवाही होवून त्यास वैदयकीय अधिकारी, सिव्हील हा◌ॅस्पीटल, ठाणे यांची मंजूरी मिळल्यानंतर सदरचे बिल कोषागार कार्यालयात पाठविण्याकरीता पोलीस आयुक्तालय मिरा-भाईंदर, वसई-विरार येथे प्राप्त झालेले होते.

पोलीस आयुक्तालय मिरा-भाईंदर, वसई-विरार कार्यालयातील वरिष्ठ लिपीक संजय पवार व लिपीक गणेश वाघेरे हे माझे वैदयकीय खर्चाचे बिल मंजूरीकरीता कोषागार कार्यालयात पाठविण्यासाठी 3000/- रू लाचेची मागणी करीत होते. परंतू मला त्यांना लाचेची रक्कम देण्याची ईच्छा नसल्याने मी त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम दिली नाही. त्यानंतर दिनांक 27/03/2023 रोजी लोकसेवक संजय पवार यांनी मला वसई पश्चिम येथील विराज बार येथे येण्यास सांगून त्यांच्या खाण्याचे व दारूचे बिल भरण्यास सांगीतले. त्यावेळी मी नाईलाजाने लोकसेवक संजय पवार यांचे 700/- रू चे बिल भरले. त्यानंतर मी लोकसेवक यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम दिली नाही म्हणून लोकसेवक संजय पवार यांनी माझे वैदयकीय बिल त्रुटीवर परत पाठविले. व त्यानंतर मला वारंवार व्हा◌ॅटस् अ◌ॅप वर फोन करून लाचेच्या रक्कमेची मागणी करीत होते. परंतू मला त्यांना लाचेची रक्कम देण्याची ईच्छा नसल्याने मी त्यांचेविरूध्द दिनांक 12/04/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर कार्यालयात लेखी तक्रार दिलेली होती.

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर चे पोलीस निरीक्षक श्री.स्वपन बिश्वास यांनी लाचेच्या मागणीची पडताळणी करणेकामी दोन शासकीय पंच साक्षीदार बोलावून घेवून त्यांचेशी माझी ओळख करून दिली. व मी दिलेल्या तक्रारीची हकीगत सांगून ती त्यांना वाचण्यास दिली. सदरची तक्रार वाचल्यानंतर दोन्ही पंचांनी त्यावर सहया केलेल्या आहेत.

त्यांनतर दिनांक 12/04/2023 रोजी माझे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच नं. 01 यांचेसह पोलीस आयुक्तालय मिरा-भाईंदर, वसई-विरार कार्यालयात पाठविल्याप्रमाणे मी लोकसेवक संजय पवार यांची भेट घेवून लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, लोकसेवक संजय पवार यांनी माझे 7 व्या वेतन आयोगाच्या फरकाबाबत ना देय प्रमाणपत्र देण्यासाठी ठाणे ग्रामीण येथील लिपीक यांना लाचेची रक्कम देण्यास सांगीतले. तसेच माझे वैदयकीय बिल मंजूरीकरीता कोषागार कार्यालयात सादर करण्याकरीता वैदयकीय बिलाचे काम पाहणारे लोकसेवक गणेश वाघेरे यांना बोलावून त्यांच्या समक्ष माझे वैदयकीय बिल मंजूरीकरीता पाठविण्यासाठी माझेकडे एक हजार रूपये लाचेची मागणी करून लाचेची रक्कम लोकसेवक श्री.गणेश वाघेरे यांचेकडे देण्यास सांगीतल्याचे स्पष्ट झालेले आहे. सदरबाबतचे सर्व संभाषण माझे अंगावर लावलेल्या व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले आहे.

सदरच्या पडताळणी दरम्यान माझे दोन प्रलंबित वैदयकीय बिल व 7 व्या वेतन आयोगाचा हप्ता यापैकी नेमके कोणत्या कामासाठी लाचेची मागणी केली याबाबत खात्री करणे व ठाणे ग्रामिण येथील लिपीक यास किती रक्कम दयायची होती याबाबत खात्री करणे आवश्यक असल्याने पुन्हा पडताळणी कारवाई करण्याकरीता लोकसेवक संपर्क साधण्याची वाट पाहून त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे ठरविले.

त्यानंतर लोकसेवक गणेश वाघेरे यांनी त्यांच्या ओळखीचे वालीव पोलीस ठाणे येथे नेमणुकीस असलेले पोलीस अंमलदार श्री.वैभव विशे यांच्या मार्फतीने मला सोमवार दिनांक 17/04/2023 रोजी भेटण्यास येण्याचा निरोप पाठविला होता., त्याप्रमाणे मी पोलीस निरीक्षक श्री.बिश्वास यांचेशी संपर्क साधून सदरबाबत सांगीतले.

त्यानंतर दिनांक 17/04/2023 रोजी पडताळणी करणे कामी माझे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच नं. 01 यांचेसह पोलीस आयुक्तालय मिरा-भाईंदर, वसई-विरार कार्यालयात जावून लोकसेवक गणेश वाघेरे यांची भेट घेवून माझे कामाच्या अनुशंगाने बोलणी केली असता लोकसेवक गणेश वाघेरे यांनी माझे 18,000/- रू चे वैदयकीय बिल मंजूरीसाठी 1500/- रू दयावे लागतील असे सांगीतले. त्यावर मी त्यांना पाचशे रूपये साठी कशाला थांबवताय, मागच्या वेळेस हजार रूपये बोलेले होते आणि आता पुन्हा 1500/- रू बोलताय एक हजार रूपये मध्ये बिलाचे काम करून घेण्याची विनंती केली. परंतू त्यांनी 1500/- रू लागतील असे सांगीतले. त्यावेळी लोकसेवक संजय पवार हे मिटींग मध्ये असल्याने त्यांच्याशी बोलणे झाले नाही. त्यामुळे मी तेथून निघून पडताळणी पथकाजवळ आल्यानंतर थोडया वेळाने माझे व्हॉटस् अॅप वर लोकसेवक संजय पवार यांनी फोन करून मला पुन्हा त्यांच्या कार्यालयात भेटण्यास बोलाविले. त्याप्रमाणे पुन्हा माझे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच नं. 01 यांचेसह पोलीस आयुक्तालय मिरा-भाईंदर, वसई-विरार कार्यालयात गेलो त्यावेळी लोकसेवक संजय पवार हे त्यांच्या टेबलला नसल्याने मी त्यांना फोन केला त्यावेळी त्यांनी दोन मिनिटात येतो असे सांगून फोन ठेवला. त्यानंतर थोडया वेळाने लोकसेवक संजय पवार हे त्यांच्या जागेवर आल्यानंतर मी त्यांना लोकसेवक गणेश वाघेरे यांनी त्यांच्या ओळखीचे वैभव विशे यांना फोन करून मला भेटण्यास बोलाविले असल्याचे सांगीतले. तसेच माझे 7 व्या वेतन आयोगाच्या पुरवणी बिलाबाबत विचारणा केली असता, त्यांनी तो वेगळा विषय आहे असे सांगून त्याबाबतचे काम पाहणा-या लिपीक यांना बोलावून त्याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर मी त्यांना माझे वैदयकीय बिल कधीपर्यंत होईल असे विचारले असता, पुढच्या आठवडयात मंजूर होईल असे सांगीतले. तसेच मी त्यांना लोकसेवक गणेश वाघेरे हे दिड हजार रूपये मागतात असे बोललो असता, त्यांनी ''आता झालाय ना विषय क्लीअर'' असे म्हणून त्यास दुजोरा देवून पुढे बोलणे टाळले. त्यानंतर मी तेथून निघालो त्यावेळी लोकसेवक संजय पवार हे सुध्दा माझेसोबत निघाले व माझे रिक्षामध्ये आले. त्यावेळी पंच नं. 01 यांनी प्रसंगावधान राखून पडताळणी पथकाशी संपर्क साधून पडताळणी पथकाची भेट घेतली. रिक्षामध्ये लोकसेवक संजय पवार यांनी मला कुठे बसायचं असे विचारले व रिक्षा ड्रायव्हर यांना रिक्षा एस.के. स्टोन येथे घेण्यास सांगीतली व तेथील चेतन वाईन शॉप समोर रिक्षा थांबवून तेथून एक दारूची बाटली विकत घेतली. त्यावेळी मी त्यांच्यापासून थोडे लांब जावून पडताळणी पथकाच्या संपर्कात राहून पोलीस निरीक्षक श्री.बिश्वास यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मिरा रोड रेल्वे स्टेशनच्या पुर्वेस असलेल्या वाहतूक शाखेच्या चौकीजवळ पडताळणी पथकास भेटलो. त्यानंतर लोकसेवक संजय पवार यांना बहुदा माझेवर संशय आल्याने पडताळणी पंचनाम्याचे कामकाज चालू असताना लोकसेवक संजय पवार यांनी माझे व्हॉटस् अॅप वर ''आले का? यापुढे कॉल करू नका, ओके, मी ब्लॉक करतो'' असा संदेश पाठविला आहे. सदरच्या पडताळणी दरम्यान झालेले संभाषण माझे अंगावरील व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले आहे.

त्यानंतर आजपावेतो लोकसेवक संजय पवार व गणेश वाघेरे यांनी माझेशी संपर्क साधलेला नाही. तसेच माझी प्रलंबित असलेली दोन्ही वैदयकीय बिलांची रक्कम मंजूर होवून माझे बँक खात्यावर जमा झालेली असल्यामुळे नमुद लोकसेवक हे माझेकडे मागणी केलेली लाचेची रक्कम स्विकारण्याची शक्यता नसल्याने मी दिनांक 02/05/2023 रोजी 1) लोकसेवक संजय पवार, वरीष्ठ लिपीक, 2) लोकसेवक गणेश वाघेरे, लिपीक, दोन्ही नेमणुक पोलीस आयुक्तालय मिरा-भाईंदर, वसई-विरार कार्यालय यांचेविरूध्द योग्य ती कारवाई होणेकामी लाचलुचपत प्रतिबंधक

विभाग, पालघर कार्यालयात जबाब नोंदविलेला असून माझी वर नमुद दोन्ही लोकसेवकांविरुध्द भ्रष्टाचार प्रति
कायदा 1988 (सुधारणा 2018) चे कलम 7, प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.
समक्ष हे लिहून दिले.

(स्वपन बिश्वास)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Sandip Sitaram Kadam(I (Inspector)) / PNMAH **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Sandip Sitaram Kadi

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** PNMAH

पोलीस ठाणे अंमलदार
काशिमीरा पोलीस ठाणे